# Washim District Police

**Nature of Work** :- **Raid On IPL Cricket Satta**

**Police Station** :- **Mangrulpir**

**Date of Good Work done** :- **23/04/2022**

**Brief of the work done :-**

मंगरुळपिर येथील IPL सट्टा अड्ड्यावर कारवाई - 15 लाखांचा मुद्देमाल जप्त, 19 जणांवर गुन्हा दाखल.

## क्रिकेट सट्ट्यावर पोलिसांचा छापा

■ १५ लाखांचा मुद्देमाल जप्त

देशोन्नती वृत्तसंकलन...

**मंगरुळपीर** ■ शहरात दोनठिकानी विशेष पोलीस महानिरीक्षक,अमरावती यांच्या पथकाने ता २१ ते २२ चे रात्री दरम्यान क्रिकेट सट्टा व वरली मटक्यावर छापा टाकून एकूण १५ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करून १९ आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार पोलीस स्टेशन मंगरूळपीर येथे फिर्यादि नामे सपोनि ईश्वर वर्गे अमरावती ग्रामीन यांनी फिर्याद दिली मंगरूळपीर शहरात संभाजीनगर येथील चिंतामणी मंदीर समोरील एका घरात काही इसम हे आयपीएल क्रिकेट सट्टा घेत असल्याची माहिती मिळल्यावरून धाड टाकली असता आरोपी प्रमोद रमेश परळीकर, वय ३१,रा संभाजी नगर मंगरुळपीर, प्रफुल गजानन महल्ले रा शेलगाव,सैजान बेग शाकिर बेग ,रा अशोक नगर,ऋतिक कौतिक भडांगे रा मंगलधाम यांचेकडून ३६ मोबाईल एकून किंमत २०३६०० रू ., तिन लॅपटॉप चार्जर माउस कि बोर्डसह एकून किंमत ७०,ह्जार रू ., एक प्रिन्टर किंमत ७हजार रू ., एक ॲपल कंम्पनीचा नोटपॅड किंमत अंदाजे ७०,हजार रू .,एक पेनडाईव्ह व दोन नेटवर्क राउटर एकून किंमत २००० रू . ,तिन एमआय कंम्पनीचे टिव्हीकिंमत ८०,हजार रू ., दोन सोनी कंम्पनीचे व्हाईस रेकॉर्डर किंमत अंदाजे १४हजार रू . दोन मोटर सायकल व एक चार चाकी वाहन एकून किंमत ६५०००० रू . ईतर साहीत्य १००



रू . असा एकून १० , ९७,२०० रू . चा मुद्येमाल जप्त करण्यात आला. तसेच आरोपीनी एका वेबसाईटवर लोकांची अंदाजे २१ कोटी ८९ लाख रुपयांनी फसवणुक केल्याचे दिसून आले. अशा तक्रारीवरून पोलिसांनी कलम ४२०, ४६५,४६८,४७१ भादवी,तसेच ६६ सी डी,आय टि –ॲक्ट सह कलम ४,५ मुंबई जुगार ॲक्ट नुसार गुन्हा दाखल केला आहे.तर दुसऱ्या घटनेत फिर्यादी निलेश देशमुख सपोनि डि जी कार्यालय अमरावती यांनी तक्रार दिली की,त्यांना माहिती मिळाली की,विनोद परळीकर यांचे वरुड रोडवरील शेतातील गोरक्षणात काही ईसम वरली मटक्याची मोबाईलवरून खायवाडी करीत आहेत. अशा माहितीवरून धाड टाकली असता याठिकाणी आरोपी विनोद रमेशराव परळीकर,मंगेश विजय मोरे , परेश विद्याधर पटेल, ज्ञानेश्वर शिवाजी देगावे , दिपक राजू भट, तुळशिराम केशवराव भेडारकर संतोष नामदेव भानसे,यशोदिप हंसराज घरडे,योगेश विजय जाधव , विलास रामदास दहाते , मनिष दिनकरराव व्यास, राहूल मारोती सोनटटके दिपक अशोक खवले, विरेंद्र सुरजपालसिंग ठाकूर हरीष विश्वनाथ भालेराव यांचेकडून ४ लाख १३ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करून त्यांचेवर मुंबई जुगार ॲक्ट नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.( ता.प्र. )